# <u>प्रेसनोट</u>

दि. २१/११/२०२३

## महावितरण कार्यालय, गंगा व्हिलेज शाखा, हडपसर उपविभाग-२, पुणे येथील कनिष्ठ कार्यालयीन सहायक यांचेवर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | वानवडी पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३५ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | सोहिल सुलेमान शेख, वय ४२ वर्ष, पद — कनिष्ठ कार्यालयीन सहायक (वर्ग-३) गंगा व्हिलेज शाखा, महावितरण कार्यालय, बंडगार्डन विभाग, हडपसर उपविभाग-२, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ६,५००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ४,५००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ४,५००/- रुपये (त्यामध्ये रु. ३,०००/- भारतीय चलनी नोटा व १,५००/- च्या खळण्यातील बनावट नोटा) |
| पडताळणी दिनांक | २१/११/२०२३ |
| सापळा दिनांक | २१/११/२०२३ |

ठिकाण :- श्रीराम चौक, हांडेवाडी रोड, मोहम्मदवाडी, हडपसर, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या फ्लॅटचे लाईट मीटर कनेक्शन कायमचे खंडीत केले होते. ते लाईट मीटर पुन्हा चालू करण्यासाठी व लाईट बिल ऑनलाईन चालू करण्यासाठी लोकसेवक सोहिल शेख यानी तक्रारदार यांचेकडे ६,५००/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यानी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक सोहिल शेख यांनी तक्रारदार यांचेकडे खंडीत केलेले लाईट मीटर पुन्हा चालु करण्यासाठी व लाईट बिल ऑनलाईन चालू करण्यासाठी तडजोडीअंती ४,५००/- रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष मागणी करुन, लोकसेवक सोहिल शेख यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये ४,५००/- (चार हजार पाचशे रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. लोकसेवक सोहिल शेख यांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध वानवडी पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रविण निंबाळकर तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner